**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.कमलकांत वसंत म्हेत्रे
मु.भोलावडे, पो.ता.भोर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपील क्र.१०९०**
**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव,
भोर एज्युकेशन सोसायटी, भोर, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
राजा रघुनाथराव विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, भोर, जि.पुणे

**अपील क्र.१०९२**
**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यवाह,
सांगली एज्युकेशन सोसायटी, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
सौ.इंदिराबाई भिडे कन्या प्रशाला, विटा, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०९०+१०९२ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. . .२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.कमलकांत वसंत म्हेत्रे
मु.भोलावडे, पो.ता.भोर, जि.पुणे

**अपील क्र.१०९०**

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
राजा रघुनाथराव विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, भोर, जि.पुणे श्री.आर.जी.सूर्यवंशी

**अपील क्र.१०९२**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यवाह,

सांगली एज्युकेशन सोसायटी, जि.सांगली श्री.श्रीपाद पांडुरंग जोशी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,

सौ.इंदिराबाई भिडे कन्या प्रशाला, विटा, जि.सांगली कु.आक्काताई रामचंद्र भिंगारदिवे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.४.६.२००७ (अ.क्र.१०९०)<br>दि. ८.६.२००७ (अ.क्र.१०९२) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.६.२००७ (अ.क्र.१०९०) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती अधिकार कायद्यानुसार कलम ४ व ५ ची कार्यवाही केली आहे का, असल्यास व त्यासाठीच्या खर्चाचा तपशील, कार्यवाही केली नसल्यास का नाही व किती दिवसात करणे बंधनकारक आहे, सत्यप्रत करुन देण्याचे दहा रुपये घेतले जातात ते कोणत्या नियमानुसार परिपत्रकानुसार, गोळा झालेल्या रकमांचा हिशेब मिळावा व आणखी कोणकोणत्या नावे आपण फी घेता त्यांची नावे व फी रक्कम. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.कमलकांत वसंत म्हेत्रे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ व ५ च्या कार्यवाहीबाबत, तसेच सत्यप्रतीसाठी घेतल्या जाणाऱ्या शुल्काबाबत सांगली एज्युकेशन सोसायटी, सांगली व भोर एज्युकेशन सोसायटी, भोर, जि.पुणे या संस्थांकडे माहिती मागितली होती. माहिती दिली नाही व या संस्थांमध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची अंमलबजावणी झालेली नाही, म्हणून श्री.म्हेत्रे यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन अपिले केली आहेत.

दि.१७.७.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

श्री.म्हेत्रे यांना विहित मुदतीत माहिती देण्यात आली असून दहा वर्षांच्या कालावधीतील त्यांनी मागितलेल्या हिशेबाच्या प्रती घेऊन जाण्याबाबत कळविले होते, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक श्री.आर.जी.सूर्यवंशी यांनी दि.१७.७.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त व आयोगापुढील सुनावणीत नमूद केले. दहा वर्षांच्या हिशेबाबाबतचे अभिलेख अवलोकनासाठी श्री.म्हेत्रे यांना उपलब्ध करुन देण्यात आले होते. अवलोकन केल्यानंतर आवश्यक माहितीबाबत नंतर त्यांनी कोणताही संपर्क साधला नाही, असे प्रतिपादन श्री.सूर्यवंशी यांनी केले. आपल्याला बोलावून जन माहिती अधिकाऱ्यांनी कागदपत्रांची दहा-पंधरा गाठोडी दाखविली आणि छायांकित प्रती करुन घ्या, असे सांगितले. सत्यप्रतीसारख्या गरजेच्या बाबतीत शुल्क घेतले जाते. या प्रती विनाशुल्क साक्षांकित करुन मिळाव्यात, आपल्यावरील खोटे आरोप मागे घ्यावेत, असे प्रतिपादन श्री.म्हेत्रे यांनी लेखी व तोंडी केले. साक्षांकित प्रतींबाबत शाळा समितीच्या बैठकीत झालेल्या ठरावाची प्रत अपीलकर्त्यास दोन दिवसात द्यावी असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. त्यानुसार पूर्तता केल्याचे श्री.सूर्यवंशी यांनी आयोगास अवगत केले.

श्री.म्हेत्रे व्यक्तिशः माहिती नेणार होते. माहिती तयार ठेवली होती, परंतु ते नेण्यास आले नाहीत. आयोगाकडील अपिलानंतर आयोगाने विचारणा केल्यावर श्री.म्हेत्रे यांना रजिस्टर्ड पोस्टाने माहिती पाठविली. तसेच त्यांनी प्रथम अपील न करता आयोगाकडे अपील केले आहे, असे पतिपादन सांगली एज्युकेशन सोसायटीच्या जन माहिती अधिकारी कु.आक्काताई रामचंद्र भिंगारदिवे व अपिलीय प्राधिकारी श्री.श्रीपाद पांडुरंग जोशी यांनी दि.१७.७.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त व आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी केले. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची अंमलबजावणी संस्थेत झाली असल्याचे त्यांनी सांगितले.

माहिती तयार ठेवली असली तरी विहित मुदतीत त्याची लेखी पूर्वसूचना अर्जदारास/अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे, याची समज जन माहिती अधिकारी यांना देण्यात येत आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता माहिती देण्यात आली आहे. अपीलकर्त्याच्या वर नमूद केलेल्या सत्यप्रत आदीविषयक मागण्या प्रशासकीय कार्यवाहीच्या असून ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२५.९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम , २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार करुन खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत:-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १०९२/ २००९/ पुणे | श्री.बा.शं.अस्वरे सोमवार पेठ, पोलीस लाईन, एम्प्लॉयमेंट ऑफिस समोर, बिल्डिंग नं.२, रुम नं.२, पुणे -११ | सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त पुणे यांचे कार्यालय, पुणे शहर, पुणे | उप आयुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्त पुणे यांचे कार्यालय, पुणे शहर, पुणे | दि.२९.०१.२००३ ते दि.३१.०८.२००४ हा सेवा बाह्य कालावधी धरण्यासाठी सादर केलेल्या ३११ पानांचा पुरावा, सेवा पुस्तकाच्या संपूर्ण नोंदीसह छायांकित प्रत, वेळोवेळी मिळालेल्या वेतनवाढी,वेतनचिठ्ठी, तत्सम सेवाविषयक बाबींची माहिती | अपीलकर्त्याने दोन वेगवेगळ्या अर्जासाठी आयोगाकडे एकत्रित अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्ररीत्या अपील करणे आवश्यक आहे. |
| २ | १०९७/ २००९/ पुणे | श्री.शेकर शंकर राजगुरु ९०, येरवडा, राजगुरुवाडा, पुणे-६ | नायब तहसीलदार, तहसील कार्यालय पुणे शहर, पुणे | तहसीलदार, तहसील कार्यालय पुणे शहर, पुणे | सन १९३० ते १९९२ या कालावधीतील येरवडा सर्व्हे नं.११६/१ व ११६/२ चे सर्व ७/१२, ८-अ चे उतारे व फेरफार | सन १९३० ते १९४३, १९६३ ते १९७५, तसेच १९७५ते १९९२ पर्यंतचे फेरफार व ७/१२ तयार असून शुल्क भरुन घेऊन जाण्याबाबत तहसीलदार, पुणे शहर यांनी कळविले आहे. उर्वरीत सन १९४४ ते १९६२ या कालावधीतील रेकॉर्ड शिवाजीनगर |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | न्यायालयात आहे, असेही कळविले आहे. हे उतारे शासनाच्या स्वतंत्र नियमावलीनुसार विहित शुल्क भरुन अपीलकर्त्याने प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. |
| ३ | १०९८/ २००९/ पुणे | श्रीमती सिंधु घारपुरे कंडोयनियम, प्लॉट नं.१, सर्वे नं.४२/१/२८, हिंगणे बु. कर्वेनगर, पुणे -५२ | उप अभियंता (विकास योजना), पुणे महानगर-पालिका, पुणे-५ | विकास अभियंता (बांधकाम नियंत्रण), पुणे महानगर-पालिका, पुणे-५ | घारपुरे कंडोयनियम, प्लॉट नं.१, सर्वे नं.४२/१/२८, हिंगणे बु., कर्वेनगर, पुणे-५२ या बांधकामाच्या पूर्णत्वाचा दाखला दि.१७.०७.१९९० रोजी दिलेला आहे, त्याची सत्य प्रत | अपीलकर्त्याने मागणी केलेल्या कागदपत्राच्या सत्य प्रतीसाठी विहित नमुन्यात खात्याकडे अर्ज करुन व विहित शुल्क भरल्यास कागदपत्राच्या सत्यप्रती देण्यात येतील, हा अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य आहे. तथापि त्या नियमावलीनुसारचे शुल्क आकारुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती - मागणीच्या अर्जान्वये सत्यप्रत द्यावी. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील तक्त्यातील एकूण ३ अपिले अनुक्रमांक १ ते ३ (अपील क्र. १०९२/२००९/पुणे, १०९७/२००९/पुणे व १०९८/२००९/पुणे ) निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २९ -०९-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.यशवंत रावजी जगताप
मु.पो.काऱ्हाटी, ता.बारामती, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार बारामती,
ता.बारामती, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नायब तहसीलदार,
ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०९५ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.७.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.यशवंत रावजी जगताप
मु.पो.काऱ्हाटी, ता.बारामती, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा नायब तहसीलदार,
ता.बारामती, जि.पुणे श्री.बी.जे.गोरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.५.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.५.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.६.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.७.२००७ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>मौजे का-हाटी येथील गट नं.१०२३ मध्ये सन २००४ मध्ये वारस नोंदीकामी गावकामगार तलाठी यांनी गौतम बळीराम जगताप यांचे दोन जबाब घेतले आहेत त्याच्या प्रती. तसेच कोणत्या फेरफाराने माझे पुतण्या व पुतणी यांचे नांवे ग.नं.१०२३ मध्ये लावली तो फेरफार याची माहिती. |

## विवेचन

वारस नोंदीबाबत आपण तलाठ्याकडे दाखल केलेल्या कागदपत्रांच्या प्रती व फेरफाराच्या नोंदीबाबतची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी चुकीची व दिशाभूल करणारी दिली. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलाची योग्य दखल घेतली नाही, या कारणावरुन अपीलकर्ता श्री.यशवंत रावजी जगताप यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे दि.१६.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

वारसाच्या नोंदीसाठी तत्कालीन गाव कामगार तलाठी श्री.आर.एस.चव्हाण यांच्याकडे कागदपत्रे दिली होती. त्यांनी जबाबही घेतले होते. विद्यमान गाव कामगार तलाठी श्री.एस.एम.इंगुले यांच्याकडे फेरफाराच्या नोंदीची मागणी आपण केली, तेव्हा त्यांनी श्री.चव्हाण यांनी कागदपत्रे जाळून टाकली, असे उत्तर दिले, असे श्री.जगताप यांनी लेखी निवेदनात व तोंडी नमूद केले. श्री.जगताप यांचा मूळ विषय वारस नोंदीबाबतचा आहे. वारस नोंदवहीत मंडल अधिकारी यांनी नोंद रद्द केल्याचे दिसून येते. याबाबत तक्रार असल्यास महसूल नियमावलीनुसार अर्ज करणे योग्य होईल, असे त्यांना लेखी व तोंडी सांगण्यात आले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.बी.जे.गोरे यांनी केले.

मूळ कागदपत्रांबाबत चौकशी करुन संबंधितांचे लेखी खुलासे घेऊन अहवाल सादर करावा, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. श्री.जगताप यांनी उल्लेख केलेले

तत्कालीन तलाठी श्री.आर.एस.चव्हाण यांनी दि.१८.८.२००८ रोजी लेखी निवेदन सादर केले असून सन २००४ साली आपण कान्हाटी येथे तलाठी म्हणून काम करीत असताना श्री.जगताप यांनी वारस नोंदीबाबतची कोणतीही कागदपत्रे आपल्याकडे दिलेली नाहीत. वारस नोंद झाली नसल्याने फेरफार देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही, असे नमूद केले आहे. दि.४.२.२००७ व दि.१२.५.२००७ रोजी आपण तसे लेखी दिले असल्याचेही श्री.चव्हाण यांनी म्हटले आहे.

श्री.चव्हाण यांच्यानंतर श्री.एस.एम.जराड गाव कामगार तलाठी होते. दि.१७.८.२००५ रोजी आपण तलाठी सजाचा कार्यभार घेतला त्यावेळी अशा प्रकारची कागदपत्रे आपल्याला मिळाली नाहीत. तसेच गावभेट योजना, राजस्व अभियान यांची रजिस्टरे मिळाली नाहीत, असे निवेदन विद्यमान तलाठी श्री.एस.एल.इंगुले यांनी दप्तराच्या चार्ज यादीच्या नकलांसह सादर केले आहे.

श्री.जगताप यांनी वारसाची नोंद होण्याबाबत कोणतीही कागदपत्रे पूर्वीचे अगर सध्याचे तलाठी यांच्याकडे दिलेली नसल्यामुळे त्यांनी मागणी केलेल्या कोणत्याही कागदपत्राच्या नकला देता येत नाहीत. वारस नोंद होण्याबाबत त्यांना आवश्यक ती कागदपत्रे तलाठ्याकडे द्यावीत. म्हणजे नियमानुसार योग्य कार्यवाही करता येईल, असे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सादर केले.

श्री.जगताप यांनी संबंधित कागदपत्रे दिली असल्याबाबतचा कोणताही पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे कागदपत्रे सादर केली होती का, ती कोणी नष्ट केली का व का, या विषयातील प्रश्नांचा निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि. १० .९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रविंद्र सदाशिवराव यादव
स.नं.१५०/३, मोहनवाडी, आळंदी रोड, येरवडा, पुणे-६ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उपायुक्त,
परिमंडळ-४, पुणे शहर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-१,
गुन्हे शाखा, पुणे शहर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०९८/ पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १६.७.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उपायुक्त,
परिमंडळ-४, पुणे शहर प्रतिनिधी श्री.प्रसाद हसबनीस

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-१,
गुन्हे शाखा, पुणे शहर प्रतिनिधी श्री.प्रसाद हसबनीस

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.५.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सोबत छायांकित प्रत जोडली आहे. | |

## विवेचन

दि.२८.५.१९८५ रोजी केलेल्या अर्जाबाबत तपास व कार्यवाही याची माहिती अपीलकर्ता श्री.रवींद्र सदाशिवराव यादव यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-१, गुन्हे शाखा, पुणे शहर यांच्याकडे मागितली होती. मूळ अर्जाच्या अनुषंगाने श्री.यादव यांनी दि.१३.१२.२००५ रोजी पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे येथे तक्रार अर्ज व दि.३१.१.२००६ रोजी स्मरणपत्र दिले होते. या संदर्भात बारा मुद्दयांची माहिती त्यांनी मागितली होती. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी महिती दिली नाही व योग्य दखल घेतली नाही, म्हणून श्री.यादव यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे दि.१६.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

आपण केलेल्या मूळ तक्रारीत आपला व आपल्या वडिलांचा जबाब झाला. गुन्हा दाखल करण्याचे आदेश वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिले. परंतु आपल्या व आपल्या कुटुंबाच्या जिवाला धोका असतानाही गुन्हा दाखल होऊन तपास झाला नाही, असे प्रतिपादन श्री.यादव यांनी केले. संबंधित चौकशी गुन्हा शाखेकडून झाली असून श्री.यादव यांनी नमूद केलेला मूळ अर्ज उपलब्ध नसल्याचे श्री.हसबनीस यांनी सांगितले. आपल्या अर्जाची प्रत देण्यास आपण तयार असल्याचे श्री.यादव यांनी नमूद केले. त्यानुसार अर्जाची प्रत घेऊन तपासाबाबतच्या कागदपत्रांच्या प्रती त्यांना द्याव्यात. संबंधित अभिलेख जतनाच्या कालावधीनुसार उपलब्ध आहेत की नाहीत याची तपासणी अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपायुक्त, परिमंडळ-४, पुणे शहर यांनी करावी, तसा आदेश गुन्हे शाखेच्या संबंधित अधिकाऱ्यांना कळवावा व त्यांनी आयोगाला अहवाल सादर करावा, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. त्यानुसार पोलीस उपायुक्त परिमंडळ-४ श्री.जालिंदर सुपेकर यांनी दि.७.१२.२००८ रोजी, अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपायुकत, परिमंडळ-४, पुणे शहर श्री.अनिल कुंभारे यांनी दि.२५.८.२००८ व जन माहिती अधिकारी तथा

सहाय्यकपोलीस आयुक्त, गुन्हे-१, गुन्हे शाखा, पुणे शहर श्री.संग्रामसिंह निशाणदार यांनी दि.१८.८.२००८ रोजी आयोगाला सविस्तर अहवाल सादर केले आहेत. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे-१, पुणे यांनी या संदर्भात सखोल चौकशी केली. श्री.यादव हे संबंधित अर्जाची पोहोचपावती अगर अन्य कागदपत्रे सादर करु शकले नाहीत, तसेच मूळ अर्ज त्यांनी पोलीस आयुक्त कार्यालयात केलेला नसून ५१२, आर्मी बेस खडकी कमांडंट, पुणे यांच्याकडून पोलीस आयुक्त कार्यालयात चौकशीकामी कळविण्यात आले होते, असे श्री.यादव यांनी समक्ष सांगितले. त्यांचा हा मूळ अर्ज सन १९८५ ते १९८८ या कालावधीतील असून पोलीस नियमावलीनुसार पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक कार्यालयातील आवक-जावक नोंदीच्या रजिस्टरची मुदत दहा वर्षे व अर्ज, चौकशीची कागदपत्रे व अहवाल जतन करण्याची मुदत दोन वर्षे, अभिलेख नाश केल्याबाबतचे प्रस्ताव व त्यातील कागदपत्रांची मुदत एक वर्षे असल्याने सदर अभिलेख नाश झाले असल्याने उपलब्ध नाहीत, त्यामुळे संबंधितांवर कारवाई करणे योग्य नसल्याचे दिसून येत आहे, असे पोलीस उपायुक्त परिमंडळ-४ श्री.जालिंदर सुपेकर यांनी दि.७.१२.२००८ च्या अहवालात म्हटले आहे. हा खुलासा लक्षात घेता मूळ अर्जाच्या प्रती न देण्याची जन माहिती अधिकाऱ्यांची कृती योग्य ठरते. तसेच संबंधितांवर कारवाईचा प्रश्न येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ८ .९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. नामदेव बाबासाहेब खरात
मु.पो.निरा, ता.पुरंदर, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१,
(निम्नश्रेणी) पुणे, ग्रामीण पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा दुय्यम निबंधक, पुरंदर
जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११०९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १६.७.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. नामदेव बाबासाहेब खरात
मु.पो.निरा, ता.पुरंदर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१,
(निम्नश्रेणी) पुणे, ग्रामीण पुणे श्री. इ.एस.पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा दुय्यम निबंधक, पुरंदर, जि. पुणे
श्री. पु. म. डोकृस

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

दस्ताच्या संपूर्ण कारवाईस किती दिवस लागतात, दस्तानंतर दस्त, सातबारा, प्रॉपर्टी कार्ड नोंदणी कार्यवाहीस किती दिवस लागतात, त्याबाबतच्या कालावधीची संपुर्ण माहिती, तसेच सन १९९८ मध्ये दस्त क्र. २९४ व दस्त क्र. २९५ च्या नोंदणीची संपूर्ण कारवाई पूर्ण झाल्याची, तसेच नोंदणीकृत प्रॉपर्टी कार्ड व ७/१२ लेखी स्वरूपात माहिती

## विवेचन

मिळकत उताऱ्यावर कायद्याप्रमाणे आपली नोंद न लागल्याच्या कारणावरून अपीलकर्ता श्री. नामदेव बाबासाहेब खरात यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने दि. १६.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने सुनावणी घेण्यात आली.

सन १९९८ मध्ये श्री. खरात यांनी दस्त नोंदणीसाठी अर्ज दाखल केला होता. त्या अनुषंगाने मिळत उताऱ्यात नोंदणी करण्यासाठी लागणाऱ्या कालावधीची व आपल्या दस्ताच्या नोंदणीची संपूर्ण कार्यवाही पूर्ण झाल्याची नोंदणीकृत मिळकत उताऱ्यासह माहिती मिळावी, अशी मागणी श्री. खरात यांनी केली होती. जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, पुरंदर जि. पुणे यांनी विहित मुदतीत उत्तर दिले. त्या विरूध्द श्री. खरात यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१, (निम्नश्रेणी) पुणे, ग्रामीण पुणे यांच्याकडे अपील केले. दुय्यम निबंधक कार्यालयात दस्ताची नोंदणी दस्त हजर केल्यादिवशी पूर्ण झाली असून नगर भूमापन कार्यालयाच्या अभिलेखात अद्याप नोंदी झालेल्या नाहीत, त्या व्हाव्यात, ही श्री. खरात यांची मागणी नोंदणी विभागाच्या अखत्यारीत येत नाही, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले होते. तथापि दुय्यम निबंधक, पुरंदर यांनी या संदर्भातील नगर भूमापन पत्रिका पाठविल्याबाबत खातरजमा करावी व पाठविली नसल्यास ती नगर भूमापन कार्यालयाकडे पाठवून तसे अपीलकर्ता यांना अवगत करावे, असा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१, (निम्नश्रेणी) पुणे, ग्रामीण पुणे यांनी दिला. तरीही आपल्याला अपूर्ण व अयोग्य माहिती दिली म्हणून अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी श्री. खरात यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपिलात, दि.१६.७.२००८ रोजी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात व सुनावणीत केली.

श्री. खरात यांना संपूर्ण माहिती देण्यात आली आहे. एवढेच नव्हे, तर माहितीच्या अधिकारापलीकडे जाऊन प्रशासकीय कार्यवाहीचा आदेशही अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला. दुय्यम निबंधक, पुरंदर यांनी नगर भूमापन पत्रिका भूमि अभिलेख, सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे यांना दि. २.८.२००७ च्या पत्रान्वये पाठविल्याची माहिती श्री. खरात यांना देण्यात आली. पुढील नोंदणीचा विषय भूमिअभिलेख कार्यालय,

सासवड यांच्या अखत्यारीतील आहे, असे जन माहिती अधिकारी यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. नोंदणीविषयक शासन निर्णयाची प्रतही आपल्याला मिळाली नाही. ही अपुरी माहिती असल्याचे प्रतिपादन श्री. खरात यांनी केले. याबाबतच्या नियमांची माहिती श्री. खरात यांना देण्याचा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. त्यानुसार भारतीय नोंदणी आदेश संहितेमधील संबंधित पृष्ठांच्या छायांकित प्रती श्री. खरात यांना दि. ११.८.२००८ च्या पत्रान्वये पुरविण्यात आल्याचे दुय्यम निबंधक, पुरंदर (सासवड) यांनी आयोगास अवगत केले.

प्रशासकीय कार्यवाही करून ती केल्याची माहिती द्यावी, अशा स्वरूपाची श्री. खरात यांची मूळ अर्जातील मागणी आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये ही 'माहिती' ठरत नाही, तसा अर्ज व अपील करून अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी करण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १० .९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १११३/ २००९/ सोलापूर | श्री. पोपट भिमराव जाधव मु. पो. चिणके, ता. सांगोला, जि. सोलापूर | मुख्याध्यापिका, प्राथमिक माध्यमिक आश्रमशाळा, शिंदेवाडी, ता. मिरज जि. सांगली | विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सांगली | आवश्यक कागदपत्रा-अभावी मूळ माहिती अर्जातील मागणीचा बोध होत नाही. | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| २ | ११४७/ २००९/ सोलापूर | श्री. सुखदेव बापू पवार मु. पो. आलेगाव, ता. सांगोला, जि. सोलापूर | उपशिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद सोलापूर | शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद सोलापूर | आवश्यक कागदपत्रा अभावी मुळ माहिती अर्जातील मागणीचा बोध होत नाही. | १) अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. २) आवश्यक मुद्रांक शुल्क (रू.२०/-) जोडलेले नाही. |
| ३ | १२०३/ २००९/ सोलापूर | श्री. रामचंद्र धोंडीबा शिंदे मु. पो. कचरेवाडी, ता.मंगळवेढा, जि. सोलापूर | सचिव, कचरेवाडी विविध कार्यकारी सेवा सह. सोसायटी कचरेवाडी, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर | सहायक निबंधक, सहकारी संस्था मंगळवेढा, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर | सौ. चंद्राबाई सहदेव जाधव रा. कचरेवाडी, ता. मंगळवेढा यांनी मे ग्राहक न्यायमंच सोलापूर यांच्याकडे दाखल केलेल्या दाव्याच्या निकालाची व संस्थेने अपील केले असल्यास, सदर अपिलाच्या निकालाची सही - शिक्क्यांची प्रत. | १) अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. २) अपीलकर्त्याने त्रयस्थ पक्षाची माहिती मागितली आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) वरील तक्त्यातील एकूण ३ अपिले अनुक्रमांक १ ते ३ (अपील क्र ११३३ /२००९/ सोलापूर,११४७ /२००९ सोलापूर व १२०३ /२००९/सोलापूर ) निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**

**दि.१८.०९.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्रीमती संजीवनी मनोहर पवार
भारत इंग्लिश स्कूलव कनिष्ठ महाविद्यालय,
१९/२, टी.पी.स्कीम, शिवाजीनगर, पुणे-५ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य भारत इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय,
शिवाजीनगर, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १११४ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७ .७.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्रीमती संजीवनी मनोहर पवार
भारत इंग्लिश स्कूलव कनिष्ठ महाविद्यालय,
१९/२, टी.पी.स्कीम, शिवाजीनगर, पुणे-५

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य भारत इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय,
शिवाजीनगर, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.८.२००७, दि. ६.९.२००७, दि. २४..९.२००७, दि. ८.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.९.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६.९.२००७, दि.८.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सन १९९० ते २००७ या शैक्षणिक वर्षासाठीची कनिष्ठ महाविद्यालयाची वेळापत्रके मिळावीत. सन २००६ ते २००७ ऑक्टोबरअखेर इयत्ता अकरावी व बारावी, शास्त्र या वर्गाला कोणते शिक्षक पर्यावरण हा विषय शिकवितात? याच विषयाचा वार्षिक नियोजन तक्ता, वेळापत्रक, या काळातील तासिकांप्रमाणे अभ्यासक्रम व एकूण तासिकांची संख्या या विषयावर घेतलेल्या परीक्षांचे वेळापत्रक व प्रश्नपत्रिका, सही-शिक्क्यासह प्रती. | |

## विवेचन

सन १९९० ते २००७ या शैक्षणिक वर्षासाठीची कनिष्ठ महाविद्यालयाची वेळापत्रके जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवर आपल्याला दि.१.८.२००७ रोजी अर्ज देऊनही मिळाली नाही, म्हणून श्रीमती संजीवनी मनोहर पवार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.१७.७.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त उभय घटकांत एकमत झाले नाही, त्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

एस.एस.कोड नुसार वेळापत्रक हे तात्पुरत्या स्वरुपाचे असते. हे अभिलेख जतन करुन ठेवणे बंधनकारक नाही, त्यामुळे वेळापत्रके देता येत नाहीत, असे श्रीमती पवार यांनी कळविल्याचे जन माहिती अधिकारी तथा प्राचार्या श्रीमती एस.डी.डिसोझा यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात व आयोगापुढील सुनावणीत नमूद केले. संपूर्ण कनिष्ठ महाविद्यालयाच्या वेळापत्रकाची मागणी आपण केली होती. परंतु व्यक्तिशः आपल्यापुरतेच वेळापत्रक दिलेले आहे. हे अभिलेख जतन करण्याबाबत एस.एस.कोडची प्रत आपल्याला द्यावी व मागील व चालू वर्षाचे

पूर्ण वेळापत्रक द्यावे, अशी मागणी श्रीमती पवार यांनी प्रपत्रात व सुनावणीत केली. एस.एस.कोडची मागणी त्यांच्या मूळ अर्जात नाही, परंतु जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराच्या अनुषंगाने ती द्यावी व मागील व चालू वर्षाचे वेळापत्रक उपलब्धतेनुसार तीन दिवसात द्यावे असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे:

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) सुनावणीच्या वेळी आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशाच्या पूर्ततेचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी आयोगास त्वरित सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२५.०९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.चंद्रकांत शंकर कांबळे
माळेगाव बु., ता.बारामती, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा व्यवस्थापकीय संचालक,
लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, मुंबई — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा व्यवस्थापक ,
लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११२९ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७ . ७ .२००८ (वि.अ.नि.का.) |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.चंद्रकांत शंकर कांबळे
माळेगाव बु., ता.बारामती, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा व्यवस्थापक ,
लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, पुणे श्री.एस.एल.मांजरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.३.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ७.३.२००७ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>एक लाख रुपये कर्ज मंजूरीचा प्रस्ताव असताना, जामीन दिला असताना वीस हजार रुपये फक्त मंजूर केले. आपल्या प्रस्तावाशी बँक सहमत का नाही, जर बँक शासनाने पाठविलेले लाखांचे प्रस्ताव मान्य करीत नाही तर आपण ते का पाठवता, या फसवणुकीस कोण जबाबदार, याबाबत दाद मागितली असता कोऱ्या कागदावर सही घेतली व ऐंशी हजार कर्ज मंजूर झाल्याचे सांगून खातेपुस्तक काढा असे सांगितले. |
|---|---|

## विवेचन

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांनी आपल्याला मागणीप्रमाणे कर्ज न दिल्याबाबत खुलासा व त्या अनुषंगिक माहितीची मागणी अपीलकर्ता श्री. चंद्रकांत शंकर कांबळे यांनी जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, यांच्याकडे केली होती. आपण एक लाख रुपयांचे कर्ज मागितले होते, जामीन दिला होता, तरीही आपल्याला बँकेने केवळ वीस हजार रुपये कर्ज दिले. या अन्यायाविरुध्द दोन वर्षे आपण हेलपाटे मारीत असूनही आपल्याला कोणतीही माहिती दिली जात नाही व मागणीप्रमाणे रक्कम मिळत नाही, या कारणावरुन अपीलकर्ता श्री.कांबळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.१७.७.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

श्री.कांबळे यांनी मूळ अर्ज आपल्याकडे केलेला नव्हता. बँक ऑफ महाराष्ट्र शाखा, माळेगाव बु. यांनी श्री.कांबळे यांना शेळया खरेदी करुन दिल्यानंतर कोणतीही तक्रार नसल्याचे श्री.कांबळे यांनी दि.१७.७.२००६ रोजी महामंडळाला लेखी दिले आहे. त्यानंतर अचानक दि.१२.३.२००७ रोजी श्री.कांबळे यांनी महामंडळाचे मुख्यालय, मुंबई येथे माहितीच्या अधिकाराखाली अपील केले. परंतु जिल्हा कार्यालयाकडे श्री.कांबळे यांनी कोणतीही माहिती लेखी अथवा तोंडी स्वरुपात मागितली नव्हती. अपिलानंतर बँक व्यवस्थापकांशी प्रत्यक्ष चर्चा केली.

श्री.कांबळे यांनी कर्जाऊ स्वरुपात घेतलेल्या शेळ्या विकल्याचे व ती कर्जफेड ते करीत नसल्याचे व्यवस्थापकांनी सांगितले, असे महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक श्री.एस.एल.मांजरे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. श्री.कांबळे यांना जास्त कर्ज मिळवून देण्याबाबत केलेल्या प्रयत्नाचा तपशील त्यांनी निवेदनाद्वारे सादर केला.

बँकेने इतरांना कर्ज दिले, परंतु आपल्या मागणीप्रमाणे कर्ज मिळाले नाही. पाहिजे तेवढे कर्ज देतो असे सांगून कोऱ्याकागदावर सही घेतली, असे प्रतिपादन श्री.कांबळे यांनी केले. एक लाखाचे कर्ज देण्याची शिफारस करुन बँकेकडे पाठविले होते. बँकेने ते किती मंजूर करावे हा बँकेचा प्रश्न आहे, असे जन माहिती अधिकारी श्री.एम.एल.मांजरे यांनी नमूद केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर केलेली कागदपत्रे पाहता आपल्या मागणीप्रमाणे कर्ज मंजूर व्हावे ही श्री.कांबळे यांची मागणी आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत त्याचा समावेश होत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १८ .९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.बाळकृष्ण दशरथ लिंभोरे
मु.पो.हिवरे, ता.पुरंधर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव,
डी.सी.एम.सोसायटी, ८९६, नाना पेठ, पुणे-२ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
राजर्षि शाहू महाराज विद्यालय, , साकिरवाडी, ता.अकोले, जि.अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११३३ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७. ७ .२००८ (वि.अ.नि.का.) |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.बाळकृष्ण दशरथ लिंभोरे
मु.पो.हिवरे, ता.पुरंधर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव,
डी.सी.एम.सोसायटी, ८९६, नाना पेठ, पुणे-२ श्री.मधुकर धर्माजी शेवाळे

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
राजर्षि शाहू महाराज विद्यालय, , साकिरवाडी, ता.अकोले, जि.अहमदनगर
श्री.सुभाष शंकर चासकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.१.२००६, दि.७.४.२००६, दि.१५.७.२००६, दि.२३.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२५.१.२००६, दि.३०.४.२००६, दि.११.८.२००६, दि.६.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.३.२००६, दि.३०.४.२००६ दि.५.९.२००७, दि.७.१२.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>जून १९८८ पासून २००३ पर्यंतच्या कालावधीतील शिक्षक हजेरीपत्रकांची प्रत, विद्यार्थी व शिक्षक सूचना वहीची प्रत, पाचवी ते दहावी विद्यार्थ्यांचे सहमाही परीक्षांचे पेपर तपासून शिक्षकांनी जमा केलेल्या यादींच्या प्रती, सहामाहीचे संकलीत निकालपत्रकाच्या प्रती, वेळापत्रकाची प्रत, नेमणूक केलेल्या शिक्षक व कर्मचारी यांच्या नेमणूक आदेशाची प्रत, या काळातील रुजू झालेले शिक्षक, त्यांच्या रुजू रिपोर्टच्या प्रती. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.बाळकृष्ण दशरथ लिंभोरे यांनी सन १९९८ पासूनची शिक्षकांच्या हजेरीपत्रकासह विविध स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, राजर्षि शाहू महाराज विद्यालय, , साकिरवाडी, ता.अकोले, जि.अहमदनगर यांच्याकडे मागितली होती. आपण या संस्थेत सेवेत असताना आपल्यावर अन्याय झाला, त्यामुळे त्याविरुध्द दाद मागण्यासाठी आपण विविध अर्जाद्वारे तपशिलवार माहिती मागितली असून ती दिली जात नाही किंवा खोटी माहिती दिली जाते, असे श्री.लिंभोरे यांनी विविध निवेदनांमध्ये नमूद केले आहे. संस्थेने संपूर्ण सत्य माहिती दिली असून जून १९९८ पासून कोणताही शिक्षक, चतुर्थश्रेणी कर्मचारी अशा एकाही कर्मचा-यास संस्थेत नेमणूक दिलेली नाही. श्री.लिंभोरे यांच्या सर्व अर्जावर वेळोवेळी माहिती देण्यात आलेली आहे, शाळा न्यायाधिकरणाकडे त्यांच्या विरोधात निकाल गेला आहे, असे मुख्याध्यापक व संस्थेचे सचिव यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

दि.१७.७.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त अपीलकर्ता श्री.बाळकृष्ण दशरथ लिंभोरे, जन माहिती अधिकारी श्री.सुभाष शंकर चासकर व अपिलीय प्राधिकारी श्री.मधुकर धर्माजी शेवाळे यांची चर्चा झाली. त्यात उभय घटकांत एकमत होऊ शकले नाही, त्यामुळे अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

संस्थेत आपण काम केले असल्याचे व सध्या आपण कोठेही नोकरीला नसल्यामुळे झालेल्या परिस्थितीचे सविस्तर निवेदन श्री.लिंभोरे यांनी केले. श्री.लिंभोरे यांच्या अडचणीचा विचार करण्यास संस्था तयार असल्याचे व संस्थेत जागा झाल्यास त्यांना नेमणूक देण्याचे आपल्याला मान्य असल्याचे निवेदन मुख्याध्यापक श्री.सुभाष चासकर व सचीव श्री.शेवाळे यांनी केले. त्यानुसार श्री.लिंभोरे यांना संस्थेच्या सेवेत घेण्यात आले असल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले आहे. तसेच एकत्रित चर्चा होऊन आपल्या अंतर्गत व अन्य सर्व तक्रारी मिटल्या असून याबाबतची अपिले निकाली काढावीत, असे लेखी निवेदन अपीलकर्ता श्री.बाळकृष्ण दशरथ लिंभोरे, जन माहिती अधिकारी श्री.सुभाष शंकर चासकर व अपिलीय प्राधिकारी श्री.मधुकर धर्माजी शेवाळे यांनी आयोगास सादर केले.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा निकाल पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १० .९.२००९**

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे यांच्याकडे दाखल केलेली खालील अपिले उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेऊन निकाली काढण्यात येत आहेत:-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ११३५/ २००९ / सातारा | श्री. शाम आबा अहिवळे ११५ अ, मंगळवार पेठ, मु.पो.व ता. फलटण, जि.सातारा | नायब तहसीलदार (निवडणूक), तहसील कार्यालय फलटण, जि.सातारा | निवडणूक तहसीलदार, तहसील कार्यालय फलटण, जि.सातारा | माढा लोकसभा मतदार संघाची निवडणूक प्रक्रिया सुरु झाल्यापासून ते अर्ज दाखल तारखे पर्यंत आचार संहिता भंग प्रकरणी दाखल केलेल्या गुन्ह्यांबाबतच्या माहितीसह एकूण पाच मुद्दयांची माहिती. | अपीलकर्त्याने दोन माहिती-मागणी-अर्जासाठी एकत्रित अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्र अपील करावे. |
| २ | ११३६/ २००९ / सातारा | श्री. नाना पालू क्षीरसागर मु.पो.बोरखळ, ता.व जि.सातारा | उप विभागीय अधिकारी, सातारा उप विभाग, सातारा | अपर जिल्हाधिकारी, सातारा | पोलीस पाटील पद भरतीच्या संबंधातील आरक्षणाबाबतची माहिती तसेच पोलीस पाटील पद भरतीच्या संदर्भात अपीलकर्त्यावर झालेला अन्याय दूर करुन न्याय मिळावा. | १) अपीलकर्त्याची अपिलातील मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. २) अपीलकर्त्याने दोन माहिती-मागणी-अर्जासाठी एकत्रित अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्र अपील करणे आवश्यक आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ११४० २००९/ सातारा | श्री. सत्वशील धैर्यशील शेळके मु.पो.लोणंद, ता.खंडाळा, जि.सातारा | निवासी नायब तहसीलदार, खंडाळा तहसील कार्यालय, खंडाळा, जि.सातारा | तहसीलदार, खंडाळा, जि.सातारा | अपीलकर्त्याने मूळ माहिती अर्ज अपिलासोबत जोडले नसल्याने नेमकी कोणती माहिती आवश्यक आहे, याचा बोध होत नाही. | अपीलकर्त्याने ५ वेगवेगळ्या माहिती मागणी अर्जांच्या अनुषंगाने एकत्रित अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्र अपील करणे आवश्यक आहे. तसेच निर्णय दिलेल्या विषयांवर वारंवार अर्ज व अपिले करुन सर्व यंत्रणांचा वेळ व श्रम वाया घालविण्याची अपिलकर्त्याची कृती योग्य नाही. याबाबत त्यांस समज देण्यात येत आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

(१) वरील तक्त्यातील एकूण ३ अपिले अनुक्रमांक १ ते ३ (अपील क्र.११३५/२००९/सातारा, ११३६/२००९/सातारा, व ११४०/२००९/सातारा ) निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १८-०९-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.हेमंत घन:श्याम चोपडे
सोमवार पेठ, पोलीस वसाहत, बिल्डिंग नं.३, रुम नं.८, पुणे-११ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उपआयुक्त, मुख्यालय,
पुणे शहर — उत्तरवादी
**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
प्रशासन, पुणे शहर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११४०+२१५९+२५५६ / पुणे / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १६.७.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.हेमंत घन:श्याम चोपडे
सोमवार पेठ, पोलीस वसाहत, बिल्डिंग नं.३, रुम नं.८, पुणे-११

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
प्रशासन, पुणे शहर श्री.एस.जी.सोनावणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.५.२००७,२८.५.२००७, १६.६.२००७, २.७.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.१.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>**अपील क्र.११४०**<br>सन २०० ते २००७ पर्यंत पो.हवालदार ३४०१ श्री.चोपडे यांचे सेवापुस्तक तपासणीचे वार्षिक शेरे, प्रमाणित प्रती, डॉग हॅन्डलर यांच्या नेमणुकीबाबत कार्यरत असलेल्या शासन निर्णयाची प्रत, डॉग मॅन्युअल प्रत, बी.डी.डी.एस.पुणे येथे कार्यरत असणारे पो.हवालदार श्री.डाळींबे, श्री.मुंडे, श्री.कदम यांनी बीडीडीएस करीता केलेल्या प्रशिक्षणाची माहिती. पोलीस शिपाई श्री.गुंड यांनी पूर्ण केलेल्या कोर्सेसची माहिती, प्रशिक्षण संस्थाचे नावाप्रमाणे, पो.निरीक्षक भारती यांनी दि.१५.४.२००५ रोजी कसुरी अहवाल पाठविला, त्यावर सहा.पोलीस आयुक्त, विशेष शाखा, पोलीस उपआयुक्त, विशेष शाखा, पुणे शहर यांनी केलेल्या आदेशाची छायांकित प्रत.<br>**अपील क्र.२१५९**<br>श्री.होडगे यांची बदली बीडीडीएस, पुणे येथे झाली. हे पद कोणत्या शासन निर्णय अथवा परिपत्रकान्वये मंजूर आहे, या पदासाठी श्री.होडगे यांनी दिलेल्या अर्जाची प्रत, त्यांच्या अर्जावरुन नेमणूक करणारे पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र.३ व सहा.पोलीस उपायुक्त, मुख्यालय यांचे अभिप्राय. श्री.होडगे यानी कोणकोणत्या ठिकाणी काम केले, त्यांच्या सेवापटात नोंद झालेल्या मेजर/मायनर शिक्षा, बक्षिसे, प्रशिक्षणे याची माहिती. तसेच बदलीची पाठविलेली कार्यालयीन टिपणी, सध्या सहा.पो.निरीक्षक हे बीडीडीएस पुणे येथे केव्हापासून कार्यरत आहेत, त्यांनी एनएसजी मणेसर, हरियाना येथील बेसीक कोर्स पूर्ण केला आहे काय, नपसल्यास का नाही, बीडीडीएस येथील प्रभारी अधिकारी यांची वैयक्तिक माहिती तसेच पूर्ण केलेल्या प्रशिक्षणाची सविस्तर माहिती.<br>**अपील क्र.२५५६**<br>एक खिडकी योजनेला क्र.२०७७, दि.६.५.२००८ च्या अनुषंगाने कारवाईचा अहवाल, तयार केलेल्या टिपण्या, आदेशाच्या प्रती, पोलीस निरीक्षक मोटार परिवहन यांच्याकडे केलेल्या चौकशी अहवालाची प्रत. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.हेमंत घनश्याम चोपडे यांनी पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या कार्यालयाकडे दि.३.५.२००७, दि.२८.५.२००७, दि.१६.६.२००७, दि.२.७.२००७, दि.१५.३.२००८, दि.१०.६.२००८ या दिनांकाना प्रामुख्याने बॉम्बे शोधक व नाशक पथकातील नेमणुका, बदल्या, वाहनांचा वापर आदींबाबतची माहिती मागितली होती. आपल्याला अपूर्ण व

असमाधानकारक माहिती मिळाल्याच्या कारणावरुन श्री.चोपडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपिले केली आहेत. यातील अ.क्र.९५० बाबतचा निर्णय आयोगाने दि.३०.६.२००८ रोजी दिला आहे.

**<u>अपील क्रमांक/११४०</u>**

श्री.चोपडे यांनी दि.३.५.२००७, दि.२८.५.२००७, दि.१६.६.२००७, दि.२.७.२००७ रोजी नमूद केलेल्या अर्जाबाबत दि.१६.७.२००७ चा अर्ज प्राप्त झालेला नसल्याचे व ऊर्वरित अर्जाबाबत केलेल्या कार्यवाहीचा तपशील कळविणारा अहवाल जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त प्रशासन श्री.सुनिल सोनावणे यांनी आयोगाला सादर केला. आपल्याला अपूर्ण माहिती देण्यात आली आहे, असे प्रतिपादन श्री.चोपडे यांनी दिलेल्या विविध लेखी निवेदनांद्वारे केले आहे.

**<u>अपील क्रमांक/२५५६</u>**

श्री.चोपडे यांना मूळ अर्ज व प्रथम अपील या व्यतिरिक्त कोणतीही कागदपत्रे सादर केलेली नाहीत. मात्र त्यांच्या मुद्दयांमधील काही माहिती मिळाल्याचे त्यांनी नमूद केले आहे. आपण दि.६.५.२००८ रोजी पोलीस आयुक्त, पुणे शहर यांना एक खिडकी योजनेत सादर केलेल्या अर्जावरील विस्तृत माहि त्यांनी या अर्जात मागितली आहे, असे अर्जावरुन स्पष्ट होते.

**<u>अपील क्रमांक/२१५९</u>**

सहाय्यक पोलीस फौजदार श्री.आर.आर.होडगे यांच्या अर्जाबाबत बीडीडएस पुणे येथे नेमणूक करणारे अधिकारी यांचे अभिप्राय आदी माहिती श्री.चोपडे यांनी मागितली आहे. जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली आहे, मात्र मग नेमणुकीस असलेल्या सहाय्यक पोलीस फौजदारांना तीन-चार वर्षात वेतन का दिले, टिपणीशिवाय नेमणूक कशी केली, याचा खुलासा करावा, अशा स्वरुपाचे प्रश्न श्री.चोपडे यांनी उपस्थित केले आहेत.

श्री.चोपडे यांना न मिळालेल्या माहितीबाबतची नेमकी यादी द्यावी व जन माहिती अधिकारी श्री.एस.जी.सोनवणे यांनी त्यानुसार माहिती देऊन अहवाल सादर करावा असा मौखिक आदेश आयोगाने अपील क्र.११४० मध्ये सुनावणीच्या वेळी दिला होता. त्यानुसार श्री.चोपडे यांनी

दि.१९.७.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, प्रशासन यांना यादी दिली. त्यानुसार माहिती देण्यात आली असल्याचा संबंधित माहितीच्या प्रतीसह श्री.सोनवणे यांनी राज्य माहिती आयोगाला दि.१४.९.२००८ च्या अहवालाद्वारे अवगत केले.

श्री.चोपडे स्वत:च्या बदलीच्या अनुषंगाने व्यथित असून त्या पार्श्र्वभूमीवर वेळोवेळी विविध प्रकारचे अर्ज करीत आहेत, असे उभ्य बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. त्यांना माहिती देण्याबाबत संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत कार्यवाही केली आहे. सुमारे तीन महिने चाललेल्या पोलीस भरतीच्या प्रक्रियेमुळे दि.२.७.२००७ च्या अर्जावरील आस्थापना शाखेकडील विस्तृत माहिती देण्यास विलंब झाला आहे, परंतु त्याबाबत श्री.चोपडे यांना पूर्वकल्पना देण्यात आलेली होती, असे श्री.सोनवणे यांनी अहवालात नमूद केले आहे. माहिती अपुरी वाटली व आपण समाधानी नाही असे श्री.चोपडे यांनी म्हटले असले तरी त्याबाबतचा नेमका तपशील सप्रमाण दिलेला नाही. अनेक मुद्दयांबाबत खुलाशाची मागणी अथवा प्रशासकीय कार्यवाहीत त्रुटी असल्याचे भाष्य त्यांनी केले असून बीडीडीएस येथे नेमणुकीस असलेले वैद्यकीय अपात्र कर्मचारी शासन निर्णयान्वये पात्र आहेत काय, तेथील कार्यरत असलेलया वैद्यकीय अपात्र कर्मचाऱ्यांची नावे व हुद्दे याबाबतची माहिती अशा स्वरुपाची विचारणा त्यांनी केलेली दिसते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अशी विचारणा 'माहिती' ठरत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ७.९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्रीमती स्वाती विश्वनाथ नाझरे
४८४/१६, लक्ष्मी गदाधर, मित्रमंडळ कॉलनी,
पर्वती, पुणे- ४११ ०९

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ-२, पुणे शहर, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
स्वारगेट विभाग, पुणे शहर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११४१/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १७.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्रीमती स्वाती विश्वनाथ नाझरे
४८४/१६, लक्ष्मी गदाधर, मित्रमंडळ कॉलनी, पर्वती, पुणे- ४११ ०९

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
स्वारगेट विभाग, पुणे शहर, पुणे तर्फे प्रतिनिधी श्री. एम.आर. वाघेला

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.७.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.८.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

दि. ३०.१२.२००६, दि. ५.२.२००७, दि. ५.४.२००७ व दि. २१.५.२००७ रोजी केलेल्या तक्रार अर्जावर काय कार्यवाही केली याबाबत माहिती

## विवेचन

आपण व आपले पती यांना झालेली मारहाण, आपल्यावर झालेला अन्याय ,त्याविरुध्द पोलिसांकडे केलेल्या तक्रारीनुसार संबंधितांवर कारवाई न करता आपल्यावरच सतत चुकीची कारवाई करण्यात आलेली आहे व त्याबाबतची चुकीची माहिती देण्यात येत आहे, असे अपीलकर्त्या सौ. स्वाती विश्वनाथ नाझरे यांनी विविध निवेदनांद्वारे लेखी स्वरुपात व आयोगापुढील सुनावणीत तोंडी प्रतिपादन केले. पोलिसांनी केलेल्या पंचनाम्यात काही नोंदी केलेल्या नाहीत, व कारवाई करण्यावे आदेश वरिष्ठांनी दिलेले असतानाही पोलीस अधिकाऱ्यांनी कारवाई केली नाही, अशी तक्रार त्यांनी केली.

सौ. नाझरे यांना सर्व कागदपत्रे देण्यात आली आहेत. पोलिसांनी केलेली कारवाई व पंचनामा योग्य की अयोग्य, याबाबतचे सविस्तर स्पष्टीकरणही त्यांना देण्यात आले आहे. मात्र हा विषय माहितीच्या अधिकारातील नाही, असे निवेदन जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एम.आर. वाघेला यांनी पूरक कागदपत्रांसह केले, ते रास्त आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २५.९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार करून खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ११४५/ २००९/ सोलापूर | श्री. राजकुमार लक्ष्मण देवकाते अे. १/६, मंत्री चंडक कॉम्पलेक्स, सम्राट चौक, सोलापूर | जन माहिती अधिकारी शिक्षणाधिकारी (माध्य.), यांचे कार्यालय, जिल्हा परिषद, सोलापूर | शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, सोलापूर | युवक शिक्षण प्रसारक मंडळ, सुकेरजवळे, ता. अक्कलकोट येथील शिक्षक भरती प्रकरणात शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती. | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| २ | १०४६/ २००९/ सोलापूर | श्री. संतोष बाळासाहेब साळुंखे १०९, धरमसी लाईन, मुरारजी पेठ, सोलापूर | अन्नधान्य वितरण अधिकारी, सोलापूर | अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर | अरूणा गॅस एजन्सीच्या अनुषंगाने माहिती. | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| ३ | १०४७/ २००९/ सोलापूर | श्री. जयराज कृष्णा शेंबडे भिमनगर, मु. पो. व ता. मंगळवेढा, जि. सोलापूर | सचिव, श्री. संत चोखामेळा मागासवर्गीय मजूर सह. संस्था, मंगळवेढा, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर | सहायक निबंधक, सहकारी संस्था मंगळवेढा, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर | सन २००१ नंतर संस्थेत किती सभासद कमी झाले, किती सभासदांची वाढ झाली, याबाबत सहायक निबंधक सहकारी संस्था यांना कळविलेल्या पत्राची प्रत, संस्थेचे खाते पुस्तकाची प्रत, मजुरांचा विमा भरलेल्या पावत्यांची | १) अपीलकर्त्याने दारिद्र्यरेषेखाली असल्याबाबतचा पुरावा सादर केलेला नसल्याने दारिद्र्यरेषेखालील पुराव्यासह फेर अर्ज करावा, असा अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य आहे. २) अपीलकर्त्याने |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | छायांकित प्रत व सन २००१ ते२००९ या कालावधीतील लेखापरिक्षण अहवाल व ताळेबंदाच्या छायाप्रती. | आयोगाकडे अपील करताना देखील दारिद्रय रेषेखाली असल्याबद्दल कोणताही पुरावा सादर केला नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) वरील तक्त्यातील एकूण ३ अपिले अनुक्रमांक १ ते ३ (अपील क्र ११४५ /२००९/ सोलापूर,१०४६ /२००९ सोलापूर व १०४७ /२००९/सोलापूर ) निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**

**दि.२५ ,०९.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री. सुधाकर छबनराव जेऊरकर
ए-११, महिम्न सोसायटी,
भाग्यश्री बिल्डिंग, कर्वेनगर, पुणे-५२ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
विभागीय कार्यालय क्रमांक १,
पुणे महानरगपालिका, पुणे-५ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
विभागीय कार्यालय क्रमांक १,
पुणे महानरगपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११६६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.०८.२००८ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** --<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,<br>विभागीय कार्यालय क्रमांक १,<br>पुणे महानरगपालिका, पुणे-५ श्री.विजय दहिभाते<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,<br>विभागीय कार्यालय क्रमांक १,<br>पुणे महानरगपालिका, पुणे-५ श्री.रा.तु.शेळकंदे | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१५.०५.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०५.०७.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२३.०७.२००७ |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>श्री.अशोक सोनबा चौधरी व इतरांनी आर्किटेक्ट श्री.राजू घाटगे यांच्याकडून जा.क्र.६०३,दि.०२.०९.२००४ रोजी स.नं.३ हिस्सा नं.१ अ/ १अ/ १येथील मोकळ्या जागेच्या लेआऊट | |

| | |
|---|---|
| | मंजुरीच्या अनुषंगाने - गुंठेवारी कायद्यान्वये मंजूर केलेला ले आऊट दाखला क्र.३१२२७ मध्ये श्री.जेऊरकर यांची जागा चुकीची दर्शविली, ओपन प्लॉटच्या बाजूला श्री.जेरुरकर यांचा प्लॉट दर्शविला, श्री.अशोक चौधरी यांनी मोजणीचा नकाशा दाखल केला असल्यास त्याची प्रत, सदर प्लॉटचे मोजमाप व दिशा चुकीचे दर्शविले आहे, सदर प्लॉटवर श्री.कपिल यांची जागा दर्शविली आहे. तसेच श्री.जेऊरकर यांच्या जागेला पश्चिम-पूर्व दर्शविलेला रस्ता चुकीचा आहे. |

## विवेचन

वारजे येथील मोकळ्या जागेच्या लेआऊट मंजुरीच्या अनुषंगाने एकूण ०७ मुद्दयांची माहिती अपीलकर्ता श्री.सुधाकर छबनराव जेऊरकर यांनी मागितली होती. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्याकडून प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने श्री.जेऊरकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. या अपिलाची सुनावणी दि.१२.०८.२००९ रोजी घेण्यात आली, यावेळी अपीलकर्ता गैरहजर होते.

सदर मोकळ्या जागेत बांधकाम करतेवेळेस प्रत्यक्ष नकाशे मंजूर करताना अपीलकर्त्यास रस्ता देऊन नकाशे मंजूर करण्याचे महानगरपालिकेने मान्य केले आहे. त्यास अधीन राहून क्षेत्रीय अधिकारी, वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका,पुणे यांनी दिलेल्या उत्तराने (पत्र क्र.४९२४/२०/२/०८) आपले समाधान झाले असल्याने अपील निकाली काढावे, असे अपीलकर्ता श्री.सुधाकर जेऊरकर यांनी दि.११.०८.२००९ चे निवेदन विचारात घेता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : २३ / ०९/२००९**

(स्टॅम्प: राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *)

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ११६९/ २००९/ सांगली | देवेंद्र काशिनाथ सहस्त्रबुध्दे 'अवधुत' सावरकर कॉलनी, मार्ग क्र.२, विश्रामबाग, सांगली | सहायक आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका. सांगली | आयुक्त, सांगली, मिरजआणि कुपवाड शहर महानगरपालिका, जि. सांगली | १. महानगरपालिकेचे पत्र क्र. ३५४ दिनांक १/१०/०८ व २१९, दि.३०.७.०८ व महानगरपालिका आयुक्त यांना दि. ९/९/०८ रोजी सादर केलेल्या कार्यालयीन टिपणीप्रमाणे नवीन पंप बसवून कार्यान्वित करण्याची अखेरची तारीख ३१/१२/०८ होती. त्यानंतर पाणी पुरवठयात सुधारणा होणार आहे. इत्यादी विविध विभागातील माहिती<br>२. लोकसभा निवडणूक जाहिर झाल्या नंतर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ स्थगित ठेवला आहे का ? याबाबतचा खुलासा व | १. अपीलकर्त्याने दोन वेगवेगळया महिती मागणी अर्जांसाठी एकत्रित अपील केले आहे. स्वतंत्र विषयातील अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्र अपील करणे आवश्यक आहे.<br>२. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत खुलासा,भाष्य, अभिप्राय इ. मागता येत नाही.<br>३. अपीलकर्त्यांच्या पाणीपुरवठा-विषयक तक्रारीबाबतच्या अपिलावर आयोगाने पूर्वी निर्णय दिलेला आहे.<br>४. पाणी पुरवठा विषयक |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | निवडणूक कार्यक्रमासाठी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती | सद्यस्थितीची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी ८ दिवसांत अपीलकर्त्यास देऊन अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. |
| २ | १११४/ २००९/ सांगली | श्री. आनंदराव दत्तात्रय शिंदे मु.पो.बोरगाव , ता.वाळवा, जि.सांगली | आय.सी.आय. सी.आय.बँक, शाखा बोरगाव, ता.वाळवा, जि.सांगली | आय.सी.आय.सी. आय.बँक, शाखा बोरगाव, ता.वाळवा, जि.सांगली | पूर्वीची दि सांगली बँक, बोरगावचे आय.सी.आय.सी.आ य बँकेत रुपांतर झ ाले त्यावेळी कर्ज, वसुली संबंधात धोरणात्मक निर्णय कोणते घेतले याबाबतचे मार्गदर्शन व स्पष्टीकरण | माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (ज) अन्वये सदरची बँक ही 'सार्वजनिक प्राधिकरण' या संज्ञेत समाविष्ट होत नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

१. वरील तक्त्यातील एकूण २ अपिले अनुक्रमांक १ ते २ (अपील क्र.११६९/ २००९ / सांगली, १११४/ २००९ / सांगली,) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्र.११६९/२००९/सांगली प्रकरणी निष्कर्षात आदेशित केल्यानुसार कार्यवाही करुन अनुपालन अहवाल मुदतपूर्तीनंतर आठ दिवसात आयोगास सादर करावा, अन्यथा संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये शास्तीव तदनुषंगिक कारवाईस पात्र राहतील.

पुणे
दि. १८.०९.२००९

( विजय कुवळेकर )
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**